
पारावरच्या गप्पा

# सूर्यफुलाची लागवड फायदेशीर होईल काय?



देवदर्शन करून गणपत पारावर बसला होता. उन्हाळा कडक असल्याने तसेच शेतातली बरीचशी कामे आटोपल्यामुळे आज तो जरा लवकरच पारावर येऊन बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसत म्हणाला, ''का रं गंपा, बराच वेळ झालेला दिसतोय तुला येऊन!''

यावर हसत गणपत म्हणाला, ''हो रं संपा, आता काही काम नाही. परंतु पुढच्या हंगामाची मात्र चाहुल सुरू झाली बघ. यावर्षी खरिपात कोणतं पीक घ्यावं तेच कळेना! आपल्याकडे सोयाबीन येत नाही, कापूस येतो- पण परत कापूस वेचायला वेळेवर मजूर मिळत नाही. त्यामुळे नुकसान होते. ऊसाने तर यावर्षी वाट लावली. एक तर भाव कमी आणि कारखान्याकडून होत असलेली पिळवणूक! त्यामुळे ऊसाची लागवड कमी करायचे ठरवले. म्हणून विचार करत होतो कोणते पीक करावे? सरकार म्हणतंय, जे विकेल तेच पिकवा. मग मी विचार करत होतो की, आता तेलाचे भाव तर गगनाला भिडले. त्यात रशिया- युक्रेनचे युद्ध सुरू. मी ऐकले आहे की आपल्याकडे सूर्यफुलाचे तेल याच देशांतून आयात केले जाते. त्यामुळे तेलाचे भाव तेजीत आहेत. मग आपणच सूर्यफुलाची लागवड केली तर? सूर्यफुलाची लागवड करून होईल का चांगला फायदा, असा मनात विचार सुरू होता. संपा, यावर तुझं काय मत पडतं?''

पुढे सरसावून संपत म्हणाला, ''गंपा, तू बोलतो ते अगदी बरोबर आहे. एकतर आपल्या देशामध्ये खाद्यतेलाचा सतत तुटवडा असतो. त्यामुळे आपण अनेक देशांतून तेल आयात करतो. पामतेल आरोग्याला चांगले नाही, तरी पण आपण याची आयात करून आपली गरज भागवतो बघ. मग अशा वेळी आपणच तेलबिया पिकांची जास्त लागवड करून त्यांचे उत्पादन वाढविले, तर आयातीसाठी सरकार हजारो कोटी रुपये खर्च करतेय तेच पैसे आपल्या शेतकऱ्याच्या खिशात येतील. दुसरे महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांनाही विविध पिकांचा पर्याय मिळाला की पीक उत्पादनात संतुलन राहील. सोयाबीनला मागील वर्षापासून चांगले दर राहिले. आपल्याकडे सोयाबीन येत नाही. सोयाबीन खरीप- रब्बी हंगामात येते. त्याच्यापेक्षा सूर्यफुलाचा विचार केला तर तीनही हंगामात म्हणजे खरीप, रब्बी आणि उन्हाळ्यामध्ये सूर्यफुलाची लागवड करता येते. आपल्याकडे सूर्यफुलाची लागवड ९० च्या दशकापर्यंत फार मोठ्या प्रमाणात केली जात होती. परंतु नंतरच्या काळात सोयाबीनचे पीक आले. या पिकाने मोठे क्षेत्र व्यापले आणि सरकारनेही सूर्यफुलाला पाहिजे तसा

हमीभाव वाढवून दिला नाही. त्यामुळे सूर्यफूल पीक मागे पडले.''

मध्येच संपतला थांबवत गणपत म्हणाला, ''तुझं बरोबर आहे रे संपा, आता आपणच नाही का सूर्यफूल लावून एकरी १० ते ११ क्विंटलपर्यंत उत्पादन घेत होतो. तेव्हा आपल्याकडे अनेक शेतकरी सूर्यफुलाचे उत्पादन घेत होते. याला कमी पाणी मिळाले तरीही काही ना काही तरी उत्पादन येत होते. पण आता २०-२५ वर्षे झाली हे पीक घेतले नाही. म्हणून तुला म्हणतो हे पीक घेतले तर चांगले पैसे मिळतील काय?''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, तुझ्या मनात आलं ना आता, तर करू आपण प्रयोग. मी करतो दोन एकर सूर्यफूल आणि तूही लागवड कर सूर्यफुलाची. अजून महिना बाकी आहे. आपणही आपल्या शेजारच्या शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांना सूर्यफुलाबद्दल माहिती देऊ. सूर्यफुलाची लागवड करून नक्कीच चांगला फायदा होईल असे मला वाटते. सूर्यफुलाला सरकारचा हमीभाव रु. ६००० प्रतिक्विंटल आहे. आपण एकरी १० ते ११ क्विंटलपर्यंत उत्पादन काढले होते. एवढे नाही मिळाले आणि फक्त एकरी आठच क्विंटल उत्पादन धरले तरी एकरी ५० हजार रुपये मिळतील. सूर्यफुलाला जास्त खर्च येत नाही. कमीत कमी खतामध्ये तसेच औषधांच्या फवारण्या करून सूर्यफूल घेता येते. त्यामुळे मला तर वाटतं आपण यावर्षी हा प्रयोग करू. कारण सूर्यफुलाची लागवड फक्त आपल्या महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवरही अत्यंत कमी आहे. म्हणूनच जास्तीत जास्त सूर्यफूल तेल आयात करावे लागते. आता युक्रेन आणि रशिया या दोघांच्या भांडणात आपण आपला फायदा करून घेतला पाहिजे की नाही?''

यावर हसत गणपतने संपतला टाळी दिली. ''पण संपा, मला एक सांग, आपण सूर्यफुलाची लागवड केली तर काही प्रश्न निर्माण होतील काय? आणि असलेच तर त्यावर काय पर्याय आहे?''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सूर्यफुलाचे उत्पादन वाढविण्यासाठी त्याचे परागीभवन होणे महत्त्वाचे आहे. यासाठी मधमाशी आपल्या शेतात असली पाहिजे. मधमाशीने फुलांमध्ये काम केले तर एकरी कमीत कमी तीन ते चार क्विंटल उत्पादन हमखास वाढणार. दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, फक्त आपणच दोघांनी सूर्यफुलाची लागवड केली तर पक्षी त्रास देणार. जसे ज्वारी- बाजरी एकट्यानेच केली तर पक्षी फार मोठे नुकसान करतात. यासाठी आपल्याला इतरही शेतकऱ्यांना सूर्यफूल लागवडीसाठी तयार करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. यामुळे सूर्यफूल उत्पादक शेतकऱ्यांचा आपण एक गट तयार करू शकतो. याच्या माध्यमातून चांगल्या कंपनीचे सूर्यफुलाचे बियाणे उपलब्ध करता येईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण जर ग्रुप तयार केला तर त्याच्या माध्यमातून सूर्यफुलामध्ये परागीभवन होऊन उत्पादनात वाढ करण्यासाठी मधमाश्यांच्या पेट्या भाड्याने आणू शकतो. जसजसे शेतकऱ्यांचे पीक फुलोऱ्यात येईल तसतशा या मधमाश्यांच्या पेट्या त्यांच्या शेतामध्ये ठेवता येतील. यामुळे सूर्यफुलाच्या उत्पादनात ३ ते ४ क्विंटल वाढ झाली तर १५ ते २० हजार रुपयांचे उत्पादन वाढेल. या तुलनेत शेतकऱ्यांना केवळ ४ ते ५ हजार रुपयेच खर्च येईल.''

गणपतच्या चेहऱ्यावर चमक वाढली होती. मध्येच संपतचा हात धरत गणपत म्हणाला, ''संपा, आपण जर अशा प्रकारचा सूर्यफूल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा गट केला तर तयार झालेल्या सूर्यफुलाच्या विक्रीसाठी याचा फायदा होईल. माझ्या डोक्यात तर कल्पना आली. आपणच सूर्यफुलापासून तेल काढण्यासाठी एक लहान युनिट टाकू. आज सूर्यफुलाचे घाण्यावर काढलेले तेल ३०० रुपये किलो आहे. यातून आपणच गटाच्या माध्यमातून उद्योग सुरू करू शकतो. दुसरे, तू म्हणाला की मधमाश्यांच्या पेट्या भाड्याने आणायच्या! त्यापेक्षा आपल्यातीलच एक जण मधमाशी पालनाचे प्रशिक्षण घेऊन त्याने हा व्यवसाय सुरू केला तर आपल्याला कमी पैशांत मधमाश्यांच्या पेट्या गावातच उपलब्ध होतील. तसेच यातून मधही मिळेल आणि रोजगाराचा प्रश्नही सुटेल.''

यावर संपत हसत म्हणाला, ''गंपा, तुझी आयडिया मला आवडली बघ. आपण आता सूर्यफुलाच्या लागवडीसाठी आजच गट तयार करू. शक्य झाले तर आपणच गावातील ग्रामसभेतही हा विषय मांडू. आपण आपले गाव 'सूर्यफूलमय' तर करूच, त्याचबरोबर 'मधमाशीचे गाव' म्हणूनही या गावाचा नावलौकिक आपल्याला वाढवता येईल. चल आता चहा घेता घेता आपल्या इतर मित्रांसोबत हा विषय चर्चेला घेऊ.''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

■